ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 2 | OCTOBER - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# समाज व संस्कृतिचा साहित्यावर पडलेला प्रभाव




**प्रा.डॉ.लतिका महादेव कट्टीमनी**
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान,
महाविद्यालय,मंद्रूप ता.द .सोलापूर ,जि.सोलापूर.

## प्रस्तावना:

समाज जीवनाचे व समाजातील संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. किंबहुना साहित्य हा त्यांचा आरसा असतो. अर्थात त्यातून समाजाचा चेहरा दिसणे स्वाभाविक आहे. साहित्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष समाजावर काही संस्कार करीत असते. कधी ते ऐकीव स्वरूपाचे, मौखिक स्वरूपाचे असेल. अगदी माणसाच्या बालवयापासून हे घडत असते. मग हे साहित्य धार्मिक, राजकीय व वैचारिक स्वरूपाचे असू शकते. म्हणजेच साहित्य, समाज व संस्कृति हे एक अद्वैतच असे आहे. साहित्यामुळे समाज घडतो पण, हे साहित्य समाजाचेच देणे असते. तसेच साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंबआहे. 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे', 'संस्कृति ही विविध लोकसमुदायाची सुजीवन पद्धती आहे' अशी विविध मते आपण ऐकतो. साहित्य, समाज आणि संस्कृति हे एकमेकांना परस्पर पूरक घटक आहेत. या साहित्य, समाज आणि संस्कृतिचा एकमेकांमध्ये सहसंबध आढळतो. समाज व संस्कृतिचा तर या साहित्यावर प्रचंड प्रभाव आहे. या प्रभावाचा व्यापक विचार करावा लागतो.

## साहित्य, समाज व संस्कृति:

साहित्य आणि संस्कृति यांचा अनोन्य संबंध असून साहित्य हा एक मानवी मन, बुद्धी व पर्यायाने समाजाचा, संस्कृतिचा अविष्कार आहे, असे संत म्हणतात. साहित्याचे मूल्य समाजातील एक सर्जनशील कृती आणि एक स्वतंत्र कलानिर्मिती असे दुहेरी असते. एक सर्जनशील कृती म्हणून साहित्याचा विचार करताना केवळ वाङमयीन संदर्भात विचार करून चालत नाही तर ती कलाकृती ज्या समाजात घडली व तेथील संस्कृतिचा विचार ही अपरिहार्य ठरतो. साहित्य हे समाजजीवनाचे अंग असून समाजजीवनमानाच्या विविध अंगाचे दर्शन साहित्यातून होत असते. साहित्य हे समाजातील विविध संस्कृतितून निर्माण होते. जीवनाला समृद्धी आणते. म्हणून समाजजीवन व संस्कृतिच्या अभ्यासासाठी साहित्य आणि साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात समाजजीवन महत्वाचे ठरते.

साहित्य म्हणजे असे लेखन कि, ज्यात शब्दार्थांना एक रमणीय अर्थ असतो. भाव, कल्पना, विचारशैली इत्यादीपासून हे रमणीयत्व, ललित्य आलेले असते त्यामुळे हे लेखन लक्षणीय बनते. वाचकांना त्याच्या आस्वादातुन एक प्रकारचा आनंद प्रत्यय येत असतो. साहित्य एक व्यक्तीमहत्वाची नवनिर्मीती असते. लेखक, कवी आपली अनुभूती, आपले अनुभवविश्व

साहित्यातून व्यक्त करीत असतो. साहित्य ही एक शक्ति आहे. मनासंबंधीच्या अनुभवातून एक मन तिची निर्मिती करते आणि, अनेक माने तिचा आस्वाद घेतात. साहित्य शब्दांमधून साकार होतें. शब्द अनुभव प्रकट करतात. अनुभव अनेक मूल्यदर्शी भावघटकांनी संघटित होतो. यावरून लक्षात येते की, साहित्य कृतीमधील अनुभूती लेखकाने समाज परिसरातून घेतलेली असते.

**समाजः**

एक समाज उद्दिष्टांसाठी एक विशिष्ठ भूभागावर राहणाऱ्या व्यक्तीचा समुदाय म्हणजेच समाज होय. उगिच लोक एकत्रित आलेतर समाज बनत नाही. समाज बनविण्यासाठी त्या लोकांमध्ये संबंधांची व्यवस्था असली पाहिजे. समाज अशा एका विशिष्ट भूभागावर वसलेला असतो. समाज हा स्थायी असतो. त्यात सातत्य असते. समाजाची अशी एक वैशिट्यपूर्ण जीवनपद्धती असते. पूर्वीच्या समाजाचा उल्लेख समाज म्हणजे उत्सव असा आढळत असे.

कोणत्याही समाजाचा अनुबंध हा शेवटी समाजाशी असतो. कारण साहित्याचा मूलाधार शेवटी मानवी जीवन आणि त्याचा हा समाजच असतो. समाजजीवनाला वगळून साहित्याची निर्मिती करणे म्हणजे हवेत मनोरे बांधण्यासारखे आहे. कोणतीही चांगली दर्जेदार साहित्यकृती अशी नुसत्या कल्पनेवर निर्माती करता येत नाही. तर साहित्यकृतीचा गाभा किंवा केंद्र हा माणूस व त्याचे जगणे हाच असतो. साहित्य हे अनेक चौकटी मोडणारे, प्रभावी हत्यार आहे. म्हणून साहित्यातूतन समाजाचा अंत:स्वर उमटला पाहिजे. समाजाचे वैचारिक, सांस्कृतिक, मानसिक पोषण करण्याचे कार्य साहित्यातून होत असते.

**संस्कृतिः**

केवळ मानव हाच संस्कृति असणारा भूतलावरील एकमेव प्राणी आहे. संस्कृति ही मानवाने स्वतः निर्माण केली आहे. संस्कृति ही दोन्ही सम + कृ या एकाच धातूपासून बनले आहे. त्यांचा अर्थही व्याकरणीदृष्ट्या एकच आहे. पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला. धर्मासह समग्र अंतबार्ह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृति हा शब्द वापरला जातो. 'मनुष्य समाजाच्या डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोनय सृष्टी म्हणजेच संस्कृति होय. डॉ. इरावती कर्वे यांच्या संस्कृतिच्या व्याख्येवरून संस्कृतिची संकल्पना पूर्ण स्पष्ट होते. 'साहित्यनिर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील संस्कृति की उपक्रम आहे. तसाच तो संस्कृतिचा एक घटकही आहे. विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंत सर्व सामाजिक संस्था या संस्थाच्या लिखित-अलिखित नियमातून निर्माण झालेल्या चालीरीती, रूढी, परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतिचे चार घटक आहेत. या चार घटकांनी मिळून संस्कृति ही लघुसंज्ञाची ओळख झाली आहे.

**साहित्य, समाज आणि संस्कृतिचा सहसंबंधः**

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहेत. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजधिष्ठीत आहेत. तर प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतिचा ठेवा असतो. शिवाय साहित्य हे वाक श्रोते व प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते आणि, साहित्यिक समाज एक घटक असून साहित्यनिर्मितीने त्याला समाधान, संपत्ती व कीर्ती प्राप्त होते. या सर्वच गोष्टीत

साहित्याचा समाजाशी असलेला संबंध दिसून येतो. साहित्याचे समजावर व समाजाचे साहित्यावर बरे-वाईट परिणाम होत असतात.

साहित्य आणि संस्कृति यांचा निकटचा संबंध आहे. साहित्य हा संस्कृतिचा एक भाग आहे. संस्कृति म्हणजे विशिष्ट काळातील, समाजातील जगण्याची विशिष्ट रीती, पद्धती धाटणी होय. संस्कृतित सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते. संस्कृतिचा वारसा पूर्वजांकडून मिळतो. परंतु प्रत्येक पिढी तेवढ्यावरच समाधान मानीत नाही. परिस्थिती समायोजना करताना व चिकित्सक बुद्धीने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येत असतो. नवनवीन संस्कृतिची निर्मिती होते. मूळ संस्कृतित भर पडते. या प्रक्रयेमुळेच मानवी संस्कृतिचा विस्तार होत आला आहे.

सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण हा सामाजिक घटक वाङमयनिर्मिती आणि अभिरुची, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात वावरतात. या पर्यावरणाचा त्यांच्यावर बरे-वाईट परिणाम होणे स्वाभाविक असते. समाजाच्या आचार,विचार, रूढी व प्रथा यातून संस्कृतिला पैलू प्राप्त होत असतात. लेखक आणि वाचक याच सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणात वाढलेला असतो. त्यामुळे समाजाच्या जीवनपद्धतीचा चित्रण त्याच्या साहित्यकृतीतून येणे स्वाभाविकच असते तसेच ते वाचकाला अपने वाटणे स्वाभाविक ठरते. स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य, स्त्री साहित्य इत्यादी साहित्य प्रकारात झालेले बदल हे काळाच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलाचे उदाहरण आहे.

## निष्कर्ष:

१) साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे. ती समाजाने निर्माण केलेल्या भाषेला आपले माध्यम म्हणून वापरात असते.

२) समाज, संस्कृति आणि वाङमय यांच्यातील संबंध अतुट असल्याने त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो.

३) साहित्य हे सामाजाचे पर्यायाने समाजजीवनाचे प्रतिनिधित्व करत असते.

४) साहित्यात आलेली प्रतिमा, छंदे, प्रतीके ही वाङमयीन तंत्रे सामाजिकच असतात.

) साहित्य हे सामाज आणि संस्कृतिच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे.

## संधर्भ ग्रंथ:

१) कऱ्हाडे सदा – साहित्य समाज.

२) कुलकर्णी अरविंदवामन – साहित्य विचार.

३) जोशी माधवशास्त्री – भारतीय संस्कृति कोष खंड – ९.

४) दु.का. संत – संत आणि संस्कृति.

) भालचंद्र नेमाडे – साहित्याचे समाजशास्त्र.